Estd. 1962

NACC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

कोरोना तथा कोविड 19 या विषाणूमुळे देशात उदभवलेली अभूतपूर्व चिंताजनक परिस्थिती लक्षात घेता या रोगाविरूध्द लढण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, प्राचार्य, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक दिवसाचे वेतन देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन मा. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

कोरोनामुळे महाराष्ट्र नव्हे तर देश आणि संपूर्ण जगच एका अभूतपूर्व आणि अदृश्य अशा संकटाचा सामना करीत आहे. या संकटावर मात करण्यासाठी सार्वजनिक संपर्क टाळणे आणि घरातच थांबणे हा एकमेव उपयुक्त उपाय आहे. खबरदारीचा उपाय म्हणून देशात टप्प्याटप्प्याने करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सर्वच उद्योग व्यवसाय ठप्प झाले आहेत. त्यामुळे देशाची आर्थिक चाके थांबली आहेत. त्याचप्रमाणे संशयित व बाधित रूग्णावर अत्यंत काळजीपूर्वक उपचार करण्यासाठी स्वतंत्र क्वारंटाईन यंत्रणा उभारण्याचीही गरज आहे. त्यासाठी आर्थिक निधीची गरज आहे. या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये सामाजिक दायित्वाच्या भावनेतून विद्यापीठाशी संबंधित घटकांनी आपला वाटा उचलणे आवश्यक आहे.

सबब आपण माहे एप्रिल, 2020 चे माहे मे, 2020 मध्ये आदा करण्यात येणा–या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करण्यासाठी आपली अनुमती आहे किंवा नाही याबाबत **paybills@unishivaji.ac.in** या ईमेलवर दिनांक 28 एप्रिल, 2020 अखेर कळविण्यात यावी. याबाबत आपण काही न कळविलेस आपली अनुमती आहे असे समजुन वरील प्रमाणे आपल्या एक दिवसाच्या वेतनाची कपात करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ ८८५
दि. 24 APR 2020

प्रति

1. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक
2. मा. कुलगुरू, मा. प्र–कुलगुरू, मा. कुलसचिव, मा संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास
3. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे

यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

अधिविभाग व विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे